**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

# योगशास्त्र पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास प्रवेश सुरु

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये एम.ए. योगशास्त्र हा अभ्यासक्रम सुरु करण्यात आला असून त्याची प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे.

आजच्या धकाधकीच्या जीवनात फक्त पैसाच कमावणे गरजेचे नसुन आपले आरोग्य सदृढ ठेवणे आवश्यक आहे. आजच्या या धकाधकीच्या काळात विविध रोग आढळून येतात. जसे उच्च रक्तदाब, मधुमेह, मायग्रेन, लठ्ठपणा, स्लिप डिस्क, अशा वेगवेगळ्या रोगांना योगाभ्यासाव्दारे बरे करता येते. अशा असाध्य रोगांवर या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येईल.

तसेच आजच्या या ताणतणावामुळे शरीरावर होणारे शारिरीक व मानसिक रोग यावर उपचार म्हणून आसन, प्राणायम, बंध-मुद्रा, षटकर्म, या यौगिक क्रियांचा उपयोग कसा करावा, व त्याचबरोबर आपले स्वास्थ सदृढ राहण्याकरिता हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून योगवर्ग चालविता येईल व यामुळे रोजगाराच्या संधी सुद्धा उपलब्ध होतील.

आपल्या कुटूबांचे आरोग्य सदृढ व निरोगी राखण्यासाठी हा अभ्यासक्रम महत्वपूर्ण आहे. सहज उपलब्ध असलेल्या विविधप्रकारच्या साहित्याच्या आधारे योगवर्ग आपल्या नगरात, परिसरात व समाजातील वंचीत घटकापर्यंत आपण या अभ्यासक्रमाव्दारे योगाभ्यास पोहचवू शकतो व योगाभ्यास पारंगत होऊ शकतो. नैसर्गिकरित्या शरीर सदृढ राहण्यास या अभ्यासक्रमातून मदत होते. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून शरीराबद्दलचे ज्ञान मिळण्यास मदत होते.

अभ्यासक्रमास कोणत्याही शाखेतील पदवीप्राप्त विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो व हा अभ्यासक्रम मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये आयोजित करण्यात आला आहे. समाजातील घरांघरामध्ये या अभ्यासक्रमाची जनजागृती होणे आवश्यक असून या सुवर्णसंधीचा जास्तीतजास्त संख्येने लाभ घ्यावा व आपला प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले.

या विषयामध्ये प्रवेश घेण्याच्या संदर्भात आजीवन व अध्ययन विस्तार विभागातील प्रा. शुभांगी रवाळे ७९७२३२४१८८, प्रा. स्वप्निल ईखार ९५१८३७३९४२, प्रा. अश्विनी राऊत ८०७८७४१४८१, प्रा. स्वप्निल मोरे ७५८८०८४४८१ यांच्याशी संपर्क साधावा, असे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी कळविले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २३/११/२०२१.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी